Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development


Multidisciplinary International Level Referred Journal

December-2021 Volume-12 Issue-26

## Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

| Chief Editor | Editor |
|---|---|
| Dr. R. V. Bhole<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

Executive Editor
Dr. Anant Narwade
Dr. Raghunath Ghadge
Mr. Anil Jagtap



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*December-2021 Volume-12 Issue-26*



*On*

# *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*



| **Chief Editor** | **Editor** |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**

**Dr. Anant Narwade**

**Dr. Raghunath Ghadge**

**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]**<br>**Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]**<br>**Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]**<br>**Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]**<br>**Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]** | **guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam**<br>**Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]**<br>**Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]**<br>**Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]**<br>**Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]** | **Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]**<br>**Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]**<br>**Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]**<br>**Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]**<br>**Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]** |



**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

| | | |
|---|---|---|
| 18 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शाश्वत शेती विकासाचे कार्य<br>प्रा.डॉ. श्रद्धानंद बा. माने | 56-59 |
| 19 | दलितांचे मानवी हक्क,जातीव्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. डॉ. रुपराव उकंडराव गायकवाड | 60-62 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर – सामाजिक विचार आणि दलित साहित्य<br>डॉ . भारत शिंदे | 63-65 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार<br>प्रा. चौधरी प्रदीप विनायक | 66-68 |
| 22 | गरीब मजदूरों और किसानों की सहायता-ज्योतिबा फुले<br>प्रा. डॉ. कदम एस. एस. | 69-71 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर धार्मिक विचार<br>प्रा.शफीक लतीफ चौधरी | 72-73 |
| 24 | छ. शाहू महाराज व ब्राह्मेतर स्त्री सुधारणा<br>डॉ. थोरे किशोर धोंडीबा | 74-78 |
| 25 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्याय विषयक विचार<br>प्रा.डॉ रमेश शेवाळे | 79-82 |
| 26 | क्रांतीयोध्दा महात्मा जोतीराव फुले<br>प्रा.सचिन पोपट सवने | 83-86 |
| 27 | शाहू महाराजांच्या अस्पृश्य निर्मूलनाच्या कार्याचा आढावा<br>प्रा. डॉ. युवराज गुंडू सुरवसे | 87-88 |
| 28 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाहीसंबंधी विचाराची प्रासंगिकता<br>श्री. समाधान विठ्ठल लोंढे | 89-91 |
| 29 | महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान<br>डॉ. अनिल बळीराम बांगर | 92-96 |
| 30 | दलित कवितेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव<br>प्रा. डॉ.सारिका विष्णूदास मोहीते | 97-100 |
| 31 | महात्मा फुलेंचे स्त्री विषयक कार्य एक दृष्टीकोन<br>प्रा. ज्योतीराम लोखंडे | 101-103 |
| 32 | राजर्षी शाहू महाराज यांचे खेळा प्रतीचे योगदान<br>शिवकुमार शामराव खबाले | 104-106 |
| 33 | डॉ. बी. आर. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि योगदान<br>डॉ. दीपक एम भारती ,साखरे ज्योती जालंदरराव | 107-109 |
| 34 | दलित साहित्य पर म.फुले और डॉ.अम्बेडकर के विचारों का प्रभाव (सुशीला टाकभौरे के साहित्य के संदर्भ में)<br>प्रा.डॉ.संगीता विश्णु भोसले | 110-113 |
| 35 | महात्मा जोतीराव फुले यांचे राजकीय विचार<br>प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी | 114-116 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान

**डॉ. अनिल बळीराम बांगर**

मराठी विभाग प्रमुख को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय-पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड

**प्रास्ताविक:**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात जेसमाजसुधारक आणि समाजचिंतक होऊन गेले त्यात महात्मा ज्योतिराव फुले यांचे स्थान अग्रक्रमाने घ्यावे लागेल. इतर समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी सामाजिक प्रश्नांकडे थोड्या अंतरावरून पाहिले पण महात्मा फुले हे प्रत्यक्षत: सामाजिक संघर्षात उभे होते.इतरांची भूमिका प्रबोधक व सुधारकांची होती.. महात्मा फुले हे केवळ प्रबोधक व सुधारक नव्हते वस्तुतः त्यांनी एका चिंतनशील सामाजिक क्रांतीवादयाची भूमिका स्वीकारली होती आणि म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील सामाजिक क्रांतीचे धुरीणत्व निःसंदिग्धपणे त्यांच्याकडे जाते. इतर विचारवंतांनी केवळ प्रबोधन कार्यालाच सुधारणा मानले. प्रबोधनाला देखील सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असणारी एक विमोचक शक्ती प्राप्त होत असते. पण केवळ प्रबोधन म्हणजे परिवर्तन नव्हे. महात्मा फुले यांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील इतर समाजचिंतकांचा सुधारणावाद हा केवळ प्रबोधनाच्या पायावर उभारलेला होता. महात्मा ज्योतिराव फुले हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.इसवी सन १८२० ते अठराशे १८७० पर्यंतचा पन्नास वर्षांचा मराठी वाङ.मयाचाकाळ हा आधुनिक मराठी वाङ.मयाचा पूर्वतयारीचा काळ ओळखला जातो. इ.स.१८७५पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त होत गेली असे आपण मानतो. आधुनिक भारतात समाज प्रबोधनाचे जे युग जन्माला आले ते ब्रिटिश सत्तेमुळे हे आपल्याला मान्य करावे लागते. ब्रिटिश अमदानीत या ठिकाणी जे शिक्षण आणि ज्ञान उपलब्ध झाले ते बुद्धिवाद व उदारमतवाद यावर आधारलेले होते

महात्मा ज्योतिराव फुले एक दृष्टे,योद्धा आणि समाज क्रांतिकारक होते. महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक विद्रोही व्यक्तिमत्व होते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रआमूलाग्र स्वरूपातबदलत होता. राजकीय सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था मध्ये परिवर्तन होत होते. भारतीय समाजाच्या लौकिक जीवनात झालेल्या उलथापालथीचा हा काळ मानला जातो. राजकीय स्थितीमध्ये बदल झालेला होता ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली होती त्यामुळे समाज जीवनात आणि लोकांच्या मानसिकतेत जरी बदल अत्यंत धिम्या गतीने होत असले तरी या कालखंडात महाराष्ट्राची वाटचाल ठळकपणे मध्ययुगाकडून आधुनिक कालखंडाकडे होताना दिसते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा पुरस्कार करणारे आणि आपल्या व्यक्तिगत जीवनात त्यांचा अंगीकार करणारे महात्मा ज्योतिराव फुले हे महाराष्ट्राच्या आधुनिकतेला दिशा देणारे एक दृष्टे विचारवंत होते. महात्मा फुले यांचा जीवन काळ हा महाराष्ट्राच्या दृष्टीने प्रबोधनाचा काळ समजला जातो. महाराष्ट्राच्या या प्रबोधनाच्या काळात क्रांतिकारी विचार मांडणारा त्याचप्रमाणे सामाजिक क्रांतीला चालना देणाऱ्या चळवळी उभारणारा कर्तासमाजसुधारक आणि विद्रोही विचारवंत म्हणूनसबंध महाराष्ट्राला म.फुले परिचित आहेत.

**व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व प्रभाव :**

२७ फेब्रुवारी १८२७ साली पुणे येथे गोविंदराव व चिमणाबाई यांच्या पोटी जोतीरावांचा जन्म झाला. जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे असतानाच त्यांच्या आईचा मृत्यू झाला. वयाच्या ७ व्या वर्षी जोतीरावांना त्यांच्या वडिलांनी शाळेत दाखल केले. परंतु प्राथमिक शिक्षण पूर्ण करताच गोविंदराव जोतिबांचे शिक्षणबंद करतात. कारण तत्कालीन समाजामध्ये शिक्षणाकडे पाहण्याची मानसिकता जुन्या वळणाची होती. अशा विचारांच्या काही लोकांकडून गोविंदरावांना सल्ले दिले जाऊ लागले की, जोतीरावांना जास्त शिकवल्यास तो कामातून जाईल. त्यामुळे गोविंदराव काही काळासाठी त्यांचे शिक्षण बंद करतात. परंतु, पुन्हा गफूर बेग मुन्शी व ख्रिस्ती धर्मोपदेशक लिजिटसाहेब यांनी जोतीरावांची तल्लख बुद्धिमत्ता पाहून पुढचे शिक्षण घ्यायला पाहिजे, असे गोविंदरावांच्या गळी

उतरवले. त्यामुळे पुढे १८४१ मध्ये गोविंदरावांनी जोतिबांना एका स्कॉटिश मिशनच्या शाळेत घातले. १८४७ मध्ये जोतिबांनी इंग्रजी शाळेतील शिक्षण पूर्ण केले. जोतिबांना तिथे वॉशिंग्टन, मार्टिन ल्यूथर, थॉमस पेन यांसारख्या विचारवंतांची चरित्रे वाचायलामिळाली. त्याचबरोबर अमेरिकेचा स्वातंत्र्यलढा, फ्रान्स राज्यक्रांती यांसारख्या मानवी स्वातंत्र्याच्या लढ्यांचाही त्यांना परिचय झाला. महात्मा फुले यांच्या व्यक्तिमत्वावर चार्वाक, बुद्ध, कबीर, तुकाराम, दादोबा पांडुरंग या देशीविचारवंत समाजसुधारकांबरोबरच थॉमस पेन, मार्टिन ल्यूथर, रेमिंग्टन, डॉ. स्टिव्हनसन, डॉ. विल्यम इत्यादी पाश्चात्य विचारवंतांच्या विचारकार्याचा प्रभावही दिसतो. थॉमस पेन यांच्या The Rights of Man या ग्रंथाचा खूप मोठा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर दिसतो. मानवी हक्क व प्रतिष्ठेसाठी लढण्याचे बळ त्यांना या ग्रंथामुळेच मिळाले. त्यातील पेन यांचे धर्मचिंतन त्यांना विशेष भावले. पेनने केलेल्या धर्मचिंतनामध्ये त्यांना खऱ्या अर्थाने मानवी कल्याणाचे व समतचे तत्त्व दिसले. महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्म, गुलामगिरी, अखंडादी काव्यरचनांमधील विचारचिंतनावर पेनच्या विचारांचा खोलवर झालेला प्रभाव दिसतो. हिंदू धर्मशास्त्रे, वेद, पुराणे त्याचबरोबर बायबल, मनुसहिता, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, रामदासांचे लेखन त्यांनी सूक्ष्मपणे वाचन केलेले दिसते. महात्मा फुले यांच्या लेखनकार्यावर इंग्रज राजवटीचाही प्रभाव दिसतो. इंग्रज राजवट आधुनिकतेबरोबरच मानवी मूल्यांचा विचारही रुजवू पाहत होती; म्हणूनच ते या राजवटीचे समर्थन करताना दिसतात. म.फुले यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी आणि अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली. मुंबईच्या जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स. १८८८ यासाली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिकवारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात. २४ सप्टेंबर १८७३ रोजी, त्यांनी आपल्या अनुयायांसह, सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.यात सर्व जातीधर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले.'शेतकऱ्यांचे आसूड' हा महात्माफुले यांचा प्रसिद्ध ग्रंथहोय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी या विरुद्धची प्रतिक्रिया महात्माफुले यांच्या साहित्यातून उमटलेलीहोती. त्या काळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समता धिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्माफुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्यसमाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे.

**शैक्षणिक कार्य:**

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत:

विद्येविना मती गेली।
मतीविना नीती गेली।
नीतीविना गती गेली।
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले।

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी सावित्रीबाईंवर सोपविली. आणि यानंतर जोतीबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.महात्मा फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक, सामाजिक विषमता टिकवून धरण्यास जातिभेद कारणीभूत आहेत, हे त्यांनी निर्भीडपणे मांडले. शूद्रातिशूद्राच्या प्रगतीच्या मार्गात जर सर्वांत मोठा अडथळा कोणता असेल तर तो जातिभेदाचा; म्हणूनच त्यांनी मूलगामी समाजपरिवर्तनासाठी जातिभेदावर हल्ला चढवला. जातीसंस्थेच्या उत्पत्तीसंबंधी फुले यांनी

स्वतःच्या साहित्यात त्यासंदर्भातील आपली मते मांडली. आहेत.दुर्गाबाई भागवत म्हणतात: "भरभराट इच्छिणाऱ्या कोणत्याही समाजाला परंपरा मांडून दाखवणारे मनू लागतात. त्याचप्रमाणे मनूंनी मांडून ठेवलेली परंपरा जेव्हा घट्ट खोडागत बनून पुढची वाट थांबवून धरतात, तेव्हा मनूंना आव्हान करणारे फुलेसुद्धा आवश्यक असतात. महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहमदनगरच्या मिस फरार यांच्याकडून घेतली होती (मेजर कँडी फुलेंच्या शाळेला पुस्तके पुरवत असत). त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्याचं त्याच बरोबर अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केलीत. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे करीत, तसेच ते शाळांतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधने नि उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनाही उत्तेजन देत असत. स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज केला. त्या महाविद्यालयामध्ये काही प्रमाणात गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थांना निःशुल्क शिक्षण द्यावे, अशी त्यांनी प्रार्थना केली होती. त्या अर्जातील त्यांचा हेतू सफल झाला.

**सामाजिक कार्य:**

मानवी हक्कावर इ.स. १७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते. महात्मा फुले यांनी आपले सबंध आयुष्य समाजोद्धारासाठी व्यतित केले. तत्कालीन समाजामध्ये त्यांनी अनेक प्रकारच्या सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. मुलींसाठी स्वतंत्रपणे शाळा काढणारे पहिले भारतीय समाजसुधारक म्हणून त्यांना ओळखले जाते. १९४८ मध्ये पुण्यातील भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा त्यांनी सुरू केली. त्यांनतर १८६३ साली बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना केली. दरम्यानच्या काळामध्ये विधवा स्त्रियांचा प्रश्नही विकट होता. त्यांना अत्यंत अमानवी पद्धतीने वागविले जात होते. त्यांच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांचे लैंगिक शोषणही केले जात होते. त्यातून त्यांच्यावर गर्भारपण ओढवले जात असे. अशा अडचणीत सापडलेल्या विधवांना आधार देण्यासाठी आणि भ्रूणहत्या रोखण्यासाठी जोतीराव बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना करतात. अशा असहाय विधवांनी तेथे येऊन आपल्या मुलांना जन्म देण्याचे आव्हान करतात. त्यांच्या संगोपनाची पूर्णपणे जबाबदारी घेतात. या प्रसूतिगृहाची देखभाल स्वतः सवित्रीबाई करत असत.

श्री. गं. बा. सरदार महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याविषयी व व्यक्तित्वाविषयी आपल्या 'महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार' या पुस्तकात आरंभीच म्हणतात, "महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. हिंदुसमाजातील शूद्रांतिशूद्रांच्या व्यथा त्यांनी निःशंकपणे बोलून दाखविल्या. कर्जबाजारीपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी वेशीवर टांगली. खेड्यापाड्यांतील या कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्र्य हे ईश्वरनिर्मित नसून त्याचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे हे त्यांना बरोबर उमगले होते. म्हणून या व्यवस्थेतील धर्माधिष्ठित बौद्धिक गुलामगिरी, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषण यांकडे त्यांनी प्रथमच लोकांचे लक्ष वेधले. एकोणिसाव्या शतकात येथे अनेक विद्यावंत समाजसुधारक होऊन गेले. जांभेकर, दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, लोकहितवादी, भांडारकर, रानडे, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर ही नांवे सर्वश्रुत आहेत. या सर्वांची दृष्टी उदार व व्यापक होती.... तरीदेखील त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित राहिले.... उच्चवर्णीयांच्या कौटुंबिक सुधारणेपलीकडे त्यांच्या कार्याची मजल बहुधा गेली नाही. जोतीरावांच्या कार्याची दिशा याहून अगदी निराळी होती...." हा उतारा महात्मा जोतीराव फुले यांच्याविषयी नीटपणे विचार करणाऱ्या अनेक विचारवतांच्या निष्कर्षाचे सार म्हणावे लागेल.

**मराठी साहित्यातील योगदान:**

महात्मा फुले आपल्या सामाजिक कार्याला बळकटी देण्यासाठी १८५५ नंतर लेखनकार्याला सुरुवात करतात. १८५५ साली तृतीयरत्न हे नाटक लिहितात. त्यानंतर पोवाडा : छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा (१८६९), पवाडा : विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी (१८६९), ब्राह्मणांचे कसब (१८६९), गुलामगिरी (१८७३), शेतकऱ्याचा आसूड (१८८३), सत्सार अंक १ (१३ जून १८८५), सत्सार अंक २ (ऑक्टोबर १८८५), इशारा

(ऑक्टोबर १८८५), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक (१८९१), अखंडादी काव्यरचना इत्यादी स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे.

महात्मा फुले आपल्या सबंध लेखनामध्ये समाजपरिवर्तनाचा विचार प्रखरपणे मांडतात. समाजातील शोषित, वंचितांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी ते आपले लेखनकार्य करतात. अन्यायाचा प्रतिकार व शोषित वंचितांना न्याय हे त्यांच्या लेखनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. आधुनिक समाज परिवर्तनाच्या चळवळीचे जनक एक कृतिशील विचारवंत क्रांतीकारी समाजसुधारक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांना ओळखले जाते. प्रस्थापित विषमता प्रवर्तक ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरुद्ध थेट आणि ठोस असा विद्रोह करणारे क्रांतिकारी साहित्यिक म्हणून ही त्यांना ओळखले जाते मराठी साहित्यातील त्यांचे योगदान हे एखाद्या क्रांती योध्यासारखेच आहे. आधुनिक साहित्य प्रवाहांना दिशादर्शक अशा प्रकारचे त्यांचे लिखाण आहे विशेषतः ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम व कामगार साहित्य प्रवाहांना प्रेरणा देणारे आणि क्रांतीच्या दिशेने घेऊन जाणारी त्यांचे साहित्यिक योगदान आहे. महात्मा फुले यांच्या मराठी साहित्यातील योगदानाचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेताना अगदी स्पष्टपणे दिसते की सामाजिक धार्मिक आर्थिक सांस्कृतिक व शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील अमुलाग्र परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून निकराचा लढा दिलेला आहे. बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनातून त्यांनी आपले साहित्य लेखन करतानाच विवेकवादी तर्कशुद्धतेला त्यांनी अधिक प्राधान्य दिले. विवेकवादी तर्कशुद्धतेच्या जोरावरच धार्मिकतेच्या नावाखाली लुबाडणूक करणाऱ्या स्वार्थी व पुरोहित शाहीचा ते पर्दाफाश करतात. चातुर्वर्ण्य जातीभेद,अस्पृश्यता यांसारख्या समाजातील विषमता प्रवण गोष्टीचा धर्माशी काही संबंध नाही असा एकंदर विचार ते मानतात मानवी समतेच्या आड येणाऱ्या कोणत्याही गोष्टींना ते आपले लक्ष बनवितात स्वातंत्र्य समता न्याय बंधुता नीती सदाचार सहिष्णुता आत्मपरीकृपण शिक्षण यासारख्या मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी ते आपल्या लेखणीचा प्रभावीपणे वापर करताना दिसतात

प्रस्थापित हिंदू धर्मातील सनातनी ब्राम्हण्यावादी तत्वज्ञाने निर्माण केलेल्या शोषण व्यवस्थेने बहुजन समाज समूह पूर्णतः नागवला गेला होता. त्याला नवा जीवनमार्ग दाखवण्यासाठीच २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि या सत्यशोधक समाजासाठी आचारधर्म सांगण्याच्या आवश्यकतेतून सार्वजनिक 'सत्य धर्म पुस्तका' ची निर्मिती झाली आहे. डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, "सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक म्हणजे सत्याशोधकांचा आचारधर्मच होय. परंतु हा आचारधर्म कर्मकांडाच्या पातळीवरील नाही तर एकूण माणसाला सुखाकडे नेहरा, विचारशक्तीला प्राधान्य देणारा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केद्रवर्ती स्थान देणारा असा आहे. पारलौकिक विश्व फुले यांना मान्यच नाही. तेव्हा याच लौकिक जीवनाच्या सुखाचा शोध घेणारा असा हा सत्य धर्म आहे." त्यामुळेच माणसाच्या सुखाचे चिंतन प्रकट करणारा हा ग्रंथ मौलिक आहे. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे हे विवेचन महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान अधोरेखित करणारे आहे. महात्मा फुले आपले साहित्यलेखन करताना संबंध मानव समूहाचा, त्याच्या मानवी उत्थानाचा आणि उत्कर्षाचा विचार मांडतात. त्याचबरोबर मराठी साहित्याला वास्तवाचे भान प्राप्त करून देतात. फुले पारंपरिक मराठी साहित्यातील काल्पनिकता, तर्कशून्यता, विवेकहीनता, असंवेदनशीलता व सामाजिक उत्तरदायित्वाचा अभाव स्पष्ट करतात. शेती, शेतकरी, दलित, पददलित, स्त्री, कामगार यांची होणारी कुचेष्टा थोपवतात व त्यांच्याकडे मानवी मूल्यांच्या पातळीवर पाहण्याची दृष्टी प्राप्त करून देतात. त्यांचे मराठी साहित्यातील हे योगदान वादातीत आहे. आधुनिक साहित्यप्रवाहांना सांस्कृतिक बंडखोरीकडे वळविण्याचे श्रेयही महात्मा फुले यांनाच जाते. विशेषतः आधुनिक मराठी कविता महात्मा फुलेंच्या विचारांना कवेत घेऊनच आपली बंडखोरी व्यक्त करताना दिसते. कित्येकदा फुलेंची प्रतिमा पुढे करूनच कवी आपला सामाजिक परिवर्तनाचा मूल्यविचार व्यक्त करताना दिसतात. कथा-कादंबरीच्या बाबतीतही फुलेंचा प्रभाव असणारी लेखनदृष्टी लेखकांमध्ये दिसते. भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, सदानंद देशमुख, राजन गवस, इंद्रजित भालेराव यांसारख्या लेखकांवर हा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.

महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आणि पराक्रमाची ओळख इथल्याबहुजन समाजाला पोवाड्याच्या माध्यमातून करून दिली आहे. 'रयतेचा राजा' म्हणून ज्यांचा उल्लेख केलाजातो, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना-प्रसंगांची आठवण करून देऊनयेथील बहुजन समाजाचा आत्मविश्वास परत मिळवून देण्याचे कार्य जोतिरावांनी केले आहे. तसेच'इशारा' या ग्रंथाच्या आधारे जातीचा प्रश्न समाजासमोर मांडला आहे. 'सत्सार' या नियतकालिकाच्यामाध्यमातून सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले आहे. याबरोबरच सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाच्यामाध्यमातून जोतिरावांनी धार्मिक, सामाजिक, नैतिक, व्यावहारिक प्रश्नांची चर्चा केली आहे. एकंदरीतचमहात्मा फुले ज्या काळात लेखन करीत होते, त्या काळाचा विचार करता त्यांच्या साहित्याने मराठीसाहित्यविश्वात मोलाची भर घातली आहे, असे मला वाटते. त्यांच्या प्रेरणेतून आंबेडकरवादी साहित्यजन्माला आले. तसेच दलित साहित्याची एक व्यापक चळवळ उभी राहिली. त्यामधून कविता, कथा,कादंबरी आणि आत्मकथनासारखा नवा वाङ्मयप्रकार जन्माला आला. मराठी साहित्यातील आंबेडकरीआणि दलित साहित्याची पाळेमुळे आपणास फुलेंच्या साहित्यात, विचारांत शोधावी लागतात, त्यामुळेमहात्मा फुलेंच्या साहित्याने मराठी साहित्यविश्व अधिकाधिक समृद्ध केले आहे.

**संदर्भग्रंथ :**

१) कुलकर्णी कुसुम 'प्रबोधनपर्व', सिंहवाणी प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती २६ जाने. २००२.
२) डॉ. किरवले कृष्णा, 'दलित चळवळ आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र., आ. जून १९९६.
३) डॉ. आढाव बाबा, पुरोगामी सत्यशोधक' (त्रैमासिक) ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर, १९९३, साई प्रकाशन पुणे.
४) ४)भिडे जी. एल., पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सोळावी आवृत्ती, नोव्हेंबर २००८.
५) ५)हरी नरके– म.फुले साहित्य आणि चळवळ,प्रकाशक:प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई,प्रथमआवृत्ती-२००६.